**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक ०७/०२/२०२४.

# –: प्रेसनोट :–

**आलोसे क्र १) मनोज मेराज्या पावरा वय ३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी, ग्रामसेवक,नेमणूक-ग्राम पंचायत सिंदुरी,ता. अक्कलकुवा जि.नंदुरबार रा.मनखेडी ता.धडगाव जि.नंदुरबार.ह.मु.दामोदर नगर,तळोदा ता.तळोदा जि.नंदुरबार. २) आरोपी खाजगी इसम लालसिंग सिमजी वसावे वय-२६ वर्षे रा.गमण ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार यांनी ६,४७,०००/-रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत.**

| घटक | नंदुरबार |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | तळोदा पोलीस स्टेशन गु. रजि. नं. ८७/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ , ७ अ, प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **आलोसे क्र १) मनोज मेराज्या पावरा वय ३५ वर्षे, व्यवसाय- नोकरी, ग्रामसेवक,नेमणूक-ग्राम पंचायत सिंदुरी,ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार २) आरोपी खाजगी इसम लालसिंग सिमजी वसावे वय-२६ वर्षे रा.गमण ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार** |
| एकुण मागणी केलेली लाचेची रक्कम | **६,४७,०००/-रुपये** (सहा लाख सत्तेचाळीस हजार रु.) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **६,४७,०००/-रुपये** (सहा लाख सत्तेचाळीस हजार रु.) |
| थोडक्यात माहिती | यातील मुळ तक्रारदार यांनी सन-२०२१ ते २०२२ या कालावधीत सिंदुरी ग्रामपंचायत अंतर्गत मंजुर असलेले महात्मा गांधी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंर्तगत व जनसुविधा योजना अंतर्गत सिंदुरी ग्रामपंचायत येथील एकुण ०८ कामे मुदतीत पुर्ण केली आहेत. नमुद कामांचे मोजमाप होउन त्याचे देयक एकूण ३२,३४,०००/- रुपये ग्रामपंचायत सिंदुरी या बॅक खात्यावर शासनाकडुन प्राप्त असुन आरोपी लोकसेवक १) मनोज मेराज्या पावरा, ग्रामसेवक ग्राम पंचायत सिंधुरी ता.अक्कलकुवा २) आरोपी खाजगी इसम लालसिंग सिमजी वसावे अशांनी नमुद ३२,३४,०००/-रुपयाचे चेक काढुन देण्याच्या मोबदल्यात २० टक्के प्रमाणे रक्कम ६,४७,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष केलेल्या पडताळणीत निष्पन्न झाले आहे. व नमुद लाचेची रक्कम ६,४७,०००/- रुपये आरोपी लोकसेवक १)मनोज मेराज्या पावरा, ग्रामसेवक ग्राम पंचायत सिंधुरी ता.अक्कलकुवा २) आरोपी खाजगी इसम लालसिंग सिमजी वसावे अशांनी तक्रारदारा कडुन पंच साक्षीदारांसमक्ष लाचेची रक्कम ६,४७,०००/-रुपये स्विकारली आहे, म्हणुन गुन्हा. |
| कामगिरी पथक | सदर कामगिरी मा.पोलीस अधीक्षक सो, श्रीमती. शर्मिष्ठा घारगे-वालावलकर, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा.अप्पर पोलीस अधिक्षक सो., श्री.माधव रेड्डी, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री.नरेंन्द्र पवार (वाचक) ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री राकेश आनंदराव चौधरी ला.प्र.वि.नंदुरबार,यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री समाधान वाघ ,श्रीमती माधवी वाघ,पोहवा/विलास पाटील ,पोहवा/ विजय ठाकरे, पोना/नरेंद्र पाटील,पोना/ सुभाष पावरा ,पोहवा/देवराम गावीत, पोना/ हेमंतकुमार महाले ,पोना/ संदिप नावाडेकर, पोना/ संदिप खंडारे ,चापोना/ जितेंद्र महाले सर्व नेमणूक - ला.प्र.वि.नंदुरबार. अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार, पथकाने केली आहे. |

| | |
|---|---|
| **सापळा अधिकारी** | श्री राकेश आनंदराव चौधरी पोलीस उपअधीक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार |
| **तपास अधिकारी** | श्री राकेश आनंदराव चौधरी पोलीस उपअधीक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोवसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता: ला.प्र.वि., नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल: dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९

(राकेश आनंदराव चौधरी)
पोलीस उप अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार